स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत सामाजिक शास्त्रे
विद्याशाखेतील इतिहास विषयाच्या विद्यावाचस्पती पीएच.डी. पदवीकरीता
सादर केलेला शोध आराखडा

परभणी जिल्हयातील सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळीः एक ऐतिहासिक अभ्यास

इ.स. (1956 ते 2011)

संशोधिकेचे नाव

सौ. रंजलकर विनिता विनोदराव

एम.ए.,एम.फिल. इतिहास

मार्गदर्शक

प्रा.डॉ. एस.जी.जाधव

एम.ए.,एम.फिल., पीएच.डी.
सहयोगी प्राध्यापक, संशोधक मार्गदर्शक
इतिहास विभाग, पीपल्स महाविद्यालय, नांदेड

संशोधन वर्ष

इ.स. 2018

प्रस्तावणा (Introduction):

आपल्या परभणी जिल्हयात पुरातत्वीय उत्खनने अद्याप झालेली नाहीत. त्यामुळे प्रगैतिहास व इतिहास पूर्व कालीन कालखंडाची संगतवार माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. तरी सुध्दा सम्राट अशोकाच्या काळापासून विदर्भाचा सुसंगत इतिहास मिळतो. इ.स. १८५३ पूर्वी आपला परभणी जिल्हा विदर्भात समाविष्ट होता १८५३ च्या पूर्वीचा कालखंड बराच मोठा आहे. वृषभ देवाचा पुत्र राजा विदर्भ याने आपल्या नावाने राज्य स्थापन केले व अशा प्रकारे विदर्भ प्रांताची निर्मिती झाली. सध्याच्या अमरावती जिल्हयाच्या चांदूर तहसिलमधील कौंडिण्यपूर किंवा कुंडीनपूर ही विदर्भाची राजधानी होती. अगस्ती ऋषींनी आपल्या शिष्यांसह विंध्यपर्वत प्रथम ओलांडून दक्षिणेत वसाहती स्थापन केल्या. त्यांच्या या वसाहती गोदावरी काठ, महेंद्र व मलय पर्वतापासून ते सिंहल व्दीप म्हणजे आपच्या श्रीलंकेपर्यंत असल्याची माहिती मिळते. विदर्भकन्या लोपामुद्रा हिच्या बरोबर अगस्तींचा विवाह झाला होता. त्यांच्या शिष्यापैकी परभणी लगत प्रभावती देवीच्या उपासकांनी वसाहत केली असावी. परभणी येथील प्रभावती देवीचे पुरातनमंदिर मुस्लीम राजवटीत उध्वस्त होऊन सध्याच्या रोशनखान गल्ली मशिदीत रूपांतर झाल्याची स्थानिक परंपरा आहे.

परभणी जिल्हयात मोठे दोन येलदारी व सिध्देश्वर हे सिंचन प्रकल्प आहेत. त्यामध्ये सिध्देश्वर हे १ मे १९९९ च्या दिवशी परभणी जिल्हयाचे विभाजन झाल्यामुळे हिंगोली जिल्हयात समाविष्ट झाला.

वालूर ग्राम व पाथरी या परभणी जिल्हयातील गावांचे पौराणिक कथांचे संबंध असावेत असे दिसते. रामायण–कर्ता वाल्मीकी ऋषी हा पूर्वाश्रमीचा वाल्हूर ग्रामचा वाल्या कोळी होता. पांडवापैकी पार्थ म्हणजे अर्जूनाने पाथरी गाव वसविले अशा स्थानिक कथा आहेत. सातवाहनांची राजवट, वाकाहाकांची राजवट कलचुरींची राजवट, राष्ट्रकूट राजे, चालुक्य घराणे व १२ व्या शतकातील देवगिरीचे यादव घराणे एवढया प्रदीर्घ कालावधीपर्यंत आपल्या परभणीला समृध्द विदर्भाचा वारसा होता हे विसरता येणार नाही.

अहमदनगरच्या निझामशाहीचा संस्थापक मलिक अहमद याचा बाप मलिक हसन याचा जन्म एका ब्राम्हण कुटूंबात झालेला होता. व त्या कुटूंबाकडे वंश परंपरेने पाथरी गावचे कुलकर्णी वतन होते. मलिक हसनचे मूळ नाव तिमा भट असे होते. बहामनींच्या विजयनगर बरोबर झालेल्या संघर्षात तिमा भट हा कैद्यी झाला होता. म्हणून तेथे मुसलमान म्हणूनचा वाढला. या कालखंडात विदर्भ वऱ्हाडची सीमा अहमदनगरच्या सरहद्दीला भिडली होती. याच काळात पाथरीच्या किल्याची तटबंदी उदध्वस्त झाल्याचे उल्लेख आहेत.

मोगलांच्या फौजांनी विद्यमान परभणी जिल्हयातील पाथरी गाव जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. मोगलांच्या फौजांनी विद्यमान परभणी जिल्हयातील पाथरी गाव जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु झालेल्या लढाईत अहमदनगरच्या फौजांनी मोगल अधिकारी खाल ई खानान याचा सोनपेठ येथे ८ फेब्रुवारी १५९७ रोजी पराभव केला. १८ ऑगस्ट १६०० मध्ये मोगलांनी अहमदनगर काबीज केले. सुलतान दानियाल याच्याकडे खानदेश, वऱ्हाड आणि अहमदनगर या प्रांताचे सुभेदारपद आले. अहमदनगरच्या पाडावाबरोबरच परभणी जिल्हा मोगल साम्राज्याचा एक घटक बनला. यापुढील कालखंड मोगल–मराठा संघर्षाचा आहे. पुढे औरंगजेबाच्या मृत्युनंतर मोगलांचे दक्षिणेकडील सार्वभौमत्व नाहीसे झाले.

पण त्यांच्याच सुभेदारापैकी हैद्राबादच्या निजाम घराण्याचा संस्थापक आसफ जहा याने आपले वेगळे हैद्राबादचे राज्य निर्माण केले. मोगलकाळात परभणी जिल्हयाचा समावेश वऱ्हाडातील पाथरी व वाशिम सरकारांमध्ये होता. पुढे इंग्रज व निजाम यांच्यामध्ये ऐतिहासिक तह होऊन नळदुर्ग (उस्मानाबाद) आणि राजचूर दोआब यांचा समावेश आहे. आता निजामकडील वऱ्हाडचा आपलासा उर्वरीत प्रदेश आणि गोदावरीच्या दक्षिणेकडील काही तालुके तसेच परतूर तालुका एकत्र करून सालारजंगने इ.स. १८५३ मध्ये स्वतंत्र परभणी जिल्हा निर्माण केला. परभणीचे प्राचीन नाव प्रभावती होते. त्याचा अपभ्रंश होऊन परभणी हे नाव पडले.

२) परभणी जिल्हयाचे भौगोलिक स्थान:

स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे १९५६ साली मराठवाडा तेव्हाच्या मुंबई राज्यास जोडला होता. त्यापूर्वी मराठवाडा हैद्राबाद संस्थानात होता.

१ मे १९६२ साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. परभणी हा महाराष्ट्र राज्याचा घटक जिल्हा बनला.

दक्षिणगंगा गोदावरी या जिल्हयातून वाहते. परभणी येथे प्रभावती देवीचे सुंदर व भव्य मंदिर आहे. परभणी हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय दिशेला येतो. १ मे १९९९ या दिवशी परभणी जिल्हयाचे विभाजन होऊन परभणी व हिंगोली असे दोन जिल्हे बनले. परभणी हे जिल्हयाचे मुख्यालय असून त्यात नऊ तालुक्यांचा समावेश होतो. परभणी, जिंतूर सेलू, पाथरी, गंगाखेड, पालम सोनपेठ व मानवत हे ते तालुके आहे.

अ) सिमा:

जिल्हयाच्या पूर्वेला नांदेड व हिंगोली, दक्षिणेला लातूर व बीड पश्चिमेला बीड व जालना तर उत्तरेला हिंगोली जिल्हा आहे.

आ) लोकसंख्या:

इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्हयाची लोकसंख्या १८,३६,०८६ एवढी आहे.

इ) जमिनीचे स्वरूप:

आपला परभणी जिल्हा हा बेसॉल्टिक खडकजन्य भूप्रदेशात मोडतो. येथील माती ट्रॅमप खडकापासून तयार झाली आहे. मृदेचा पोल आणि खोलीमध्ये ठिकठिकाणी पार तफावत आहे. गोदावरी नदीच्या सुपीक खोऱ्यातील पश्चिम ते पूर्व पटयात मातीचे खोल थर आढळतात. गोदावरी नदीच्या सभोवतालचा भूभाग अत्यंत सुपीक असून कापसाची किंवा रेगूर नावाने ओळखली जाते. उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशातील जमीन उथळ व निकृष्ट दर्जा तर दक्षिणेकडील

जमीन पुष्कळ खोलीची व चांगली कसदार आहे. जिंतूर तालुक्यातील काही जमीन मध्यम ते भारी प्रतीची आहे. उर्वरीत जमीन हलक्या प्रतीची आहे.

३) विषम निवडीचा /उद्देश हेतू (Objectives Method):

परभणी जिल्हयातील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळी एक ऐतिहासिक अभ्यास (इस. १९५६ ते २०११) हा संशोधन विषय निवडीमागे संशोधकाचा विशिष्ट उद्देश आहे आतापर्यंत जिल्हयातील संतजनाबाई मंदिर (गंगाखेड), नेमीनाथ जैन मंदिर (जिंतूर), सय्यद श्हा तुराबुल हक् हा दर्गा येथे असून त्याचा उरूसही भरतो (परभणी) या क्षेत्रात बरेच संशोधन झालेले आहे. परंतू परभणी जिल्हयातील सामाजिक, सांस्कृतिक उणीव, कामगार, दलित, शेतकरी, स्त्री, शैक्षणिक मागासपण पत्रकारिता या वंचित घटकाला संशोधकाने संशोधनाच्या पटलावर आणून एक नवा अध्याय जोडण्याचा प्रयत्न केलेला आहे. परभणी जिल्हयात सन १९५६ ते २०११ या काळात अनेक चळवळी उदयास आल्या या समस्त सामाजक, सांस्कृतिक, शैक्षणिक चळवळ, दलित चळवळ, स्त्री चळवळ, पत्रकारीता तसेच शेतकरी व कामगार चळवळ या समस्त चळवळीचा सर्वांगिण अभ्यास करून समाल्टर्न संशोधन प्रणालीतून या सर्व चळवळींची चिकित्सा प्रस्तुत संशोधन विषयाच्या माध्यमातून संशोधकाने अत्यंत समर्पकपण संशोधन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

थोडक्यात दुर्बल व वंचित घटकांचा चळवळीच्या कार्याला या संशोधन कार्यात संशोधकाने चांगला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

४) संशोधन विषयाचे महत्व (Importance of Research):

परभणी जिल्हयाला प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत ऐतिहासिक वारसा प्राप्त झाला आहे. परभणी जिल्हयावर आतापर्यंत परंपरागत दृष्टीने संशोधन अनेक विषयावर झालेले आहे. परभणी जिल्हयातील अनेक धार्मिक क्षेत्र, राजकीय कार्य या विविध पैलूवर अनेक संशोधकांनी संशोधन केलेले आहे.

प्रस्तुत संशोधन विषयात उत्तर आधूनिक काळातील जो नविन संशोधन प्रकार उदयास आला तो म्हणजे सबाल्टर्न इतिहास प्रणाली यालाच वंचिताचा इतिहास असे सुध्दा म्हणतात. या संशोधनात इतिहासातील राजे, राण्या, राजवाडे व त्यांच्या लढाया यांना स्थान न देता व प्रस्थापित घटकांना बाजूला ठेवून जे इतिहासापासून खूप दूर वंचित घटक होते. त्या घटकांना या प्रस्तुत संशोधनात महत्व दिलेले असल्याने या संशोधनाचे महत्व हे मुलभूत व मुलगामी स्वरूपाचे ठरलेले आहे. या वंचित घटकांत परभणी जिल्हयातील स्त्री, शैक्षणिक घटक, शेतकरी, कामगार, दलित

पत्रकारीता व सांस्कृतिक या सर्व दुर्बल घटकांना या संशोधनात प्रमुख स्थान देण्यात आलेले आहे. त्यामुळे इ.स. १९५६ ते २०११ या काळात या घटकांनी ज्या स्वतंत्र चळवळीला उभारून आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्व घटकांचीच या संशोधनात नोंद घेतल्याने या संशोधनाचे महत्व हे अत्यंत वाढलेले आहे.

परभणी जिल्हयातील या सर्व सामाजिक चळवळी, सांस्कृतिक चळवळी, शैक्षणिक चळवळी महाराष्ट्राला व भारताच्या इतिहासाला मार्गदर्शक ठरलेल्या आहेत. या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्वपूर्ण ठरते.

५) संशोधनाची गृहीतके **(Hypothesis of Research Topic)**:

प्रस्तुत संशोधन विषयाचे संशोधन करीत असताना संशोधकाने काही गृहीतके समोर ठेवून संशोधन कार्यपूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. संशोधन कार्य करीत असतांना गृहितके यांच्याशिवाय संशोधन पुर्ण होऊ शकत नाही. संशोधनला गृहीतकामुळे दिशा प्राप्त होवुन संशोधन पूर्ण करण्यास मदत होते. प्रस्तुत संशोधन विषयाची काही गृहीतके आपणास खालीलप्रमाणे सांगता येतील.

अ) परभणी जिल्हयाला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.

ब) परभणी जिल्हयातील सामाजिक चळवळी हया समाज परिवर्तनाचे साधन म्हणून ठरलेल्या आहेत.

क) परभणी जिल्हयाच्या इतिहासात दलित चळवळीचे आगळेवेगळे स्थान राहिलेले आहे.

ड) परभणी जिल्हयातील स्त्री चळवळ ही सामाजिक परीवर्तनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरलेली आहे.

ढ) परभणी जिल्हयाच्या सर्वांगिण विकासाला शैक्षणिक चळवळीने फार मोठा हातभार लावला आहे.

ण) परभणी जिल्हयाच्या सामाजिक चळवळीमध्ये सांस्कृतिक व पत्रकारीता चळवळ यांचे स्वतंत्र एक वेगळे अस्तित्व आहे.

त) परभणी जिल्हयातील सक्रीय राजकाराणात परभणी जिल्हयातील शेतकरी व कामगार चळवळीचे योगदान अत्यंत महत्वाचे राहीलेले आहे.

वरील सर्व गृहितके हाताशी धरून संशोधकाने प्रस्तुत संशोधन विषयावर संशोधन केले आहे. ही गृहितके संशोधनाच्या सुयोग्य निष्कर्षावर व संशोधाने तपासूनच पाहण्याचा तंतोतंत प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे ही सर्व गृहितके संशोधन कार्यालयात महत्वाची ठरलेली आहेत.

६) संशोधन क्षेत्रः—

प्रस्तुत संशोधन विषयाचे अभ्यास करण्यासाठी परभणी जिल्ह्यातील जी नऊ तालूके आहेत त्यामध्ये परभणी, जिंतूर, पाथरी, सेलू, मानवत, गंगाखेड, सोनपेठ, पूर्णा व पालम या तालुक्यातील प्रमुख ज्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक चळवळीचे अध्ययन करण्यात आलेले आहे. प्रस्तुत शोध प्रबंधात परभणी जिल्ह्यातील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळीचे अध्ययन करण्यात आलेले आहे. प्रस्तुत शोध प्रबंधात परभणी जिल्ह्यातील सामाजिक सांस्कतिक व शैक्षणिक चळवळ एक ऐतिहासिक अभ्यास हे अध्यनाचे मुख्य क्षेत्र असल्याने सन १९५६ ते २०११ या कालखंडातील समस्त सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळीचा सर्वांगिण अभ्यास करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन विषयात परभणी जिल्ह्यात स्त्री चळवळ, दलित चळवळ शैक्षणिक चळवळ, सांस्कृतिक व पत्रकारीता चळवळ, शेतकरी व कामगार चळवळ या सर्व चळवळीचा उदय, विकास व चळवळीचे फलीत या संशोधन विषयात समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यामुळे परभणी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला ह्या सर्व सामाजिक चळवळी उपयुक्त ठरल्या आहेत. त्यासाठी या संशोधन क्षेत्राची निवड करण्यात आलेली आहे. ह्या सामाजिक चळवळी केवळ परभणी जिल्ह्यासाठीच नव्हे तर महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीच्या विकासाला मार्गदर्शक ठरलेल्या आहेत.

७) संशोधन पद्धती (Research Mathods) :-

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करीत असतांना अनेक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. या संशोधनामध्ये प्रामुख्याने विश्लेषणात्मक ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, सर्वेक्षण, तुलनात्मक, मुलाखत या संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. ‘‘परभणी जिल्ह्यातील सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळी एक ऐतिहासिक अभ्यास’’ (इ.स. १९६५ ते २०११)ह्या अभ्यास विषयाचे संशोधन करीत असताना अनके सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, प्रशासकीय व धार्मिक कार्यालयाना भेटी देऊन प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची साधने गोळा करण्यात आली आहेत. तसेच यामध्ये अनेक ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन हे संशोधन साधने गोळा करण्यात आलेली आहेत. तसेच या विषयाचे संशोधन करीत असताना स्त्री, कामगार, दलित व पत्रकारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. तसेच शासकीय जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्ह्यातील महानगरपालिका, सांख्यिकी कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय या कार्यालयांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. याशिवाय परभणी जिल्ह्यातील

दैनिकके, साप्ताहीके, मासिके, वार्षिके यांचा संशोधनासाठी साधन म्हणून वापर करण्यात आलेला आहे. थोडक्यात प्रस्तुत संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

८) संशोधन विषचा आराखडा :—

''परभणी जिल्ह्यातील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळी एक ऐतिहासिक अभ्यास'' (इ.स. १९५६ ते २०११) या संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालील प्रकरणांच्या आधारे अभ्यास संशोधन आराखडा तयार करण्यात आला आहे.

प्रकरण १ ले परभणी जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्याची ऐतिहासिक ओळख संक्षिपत स्वरुपात करून देण्यात आली आहे. परभणी जिल्ह्याला प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत विविध राजवटीच्या काळात महत्व प्राप्त झालेले आहे. प्राचीन काळचे हे प्रभावती गाव येथे प्रभावती देवीचे सुंदर व भव्य मंदिर आहे. परभणी हा प्रभावतीचा अपभ्रंश परभणी जिल्ह्यात पुरातन उत्खनने अद्याप झालेली नाहीत. त्यामुळे प्रगैतिहास व इतिहास पूर्व कालीन कालखंडाची संगतवार माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. तरी सुद्धा सम्राट अशोकाच्या काळापासून विदर्भाचा सुसंगत इतिहास मिळतो. इ. स. १८५३ पूर्वीचा आपला परभणी जिल्हा विदर्भात समाविष्ट होता. १८५३ च्या पुर्वीचा कालखंड बराच मोठा आहे. वृषभ देवाचा पुत्र राजा विदर्भ याने आपल्या नावाने राज्य स्थापन केले व अशा प्रकारे विदर्भ प्रांताची निर्मिती झाली. सध्याच्या अमरावती जिल्ह्याच्या चांदूर तहसीलमध्ये कौंडीण्यपूर ही विदर्भाची राजधानी होती. अगस्ती ऋषींनी आपल्या शिष्यांसह विन्ध्य पर्वत प्रथम ओलांडून दक्षिणेत वसाहती स्थापन केल्या. विदर्भाकन्या लोपामुद्रा तिच्या बरोबर अगस्तींचा विवाह झाला होता. त्यांच्या शिष्यांपैकी परभणी लगत प्रभावती देवीच्या उपासकांनी वसाहत केली असावी. परभणी येथील प्रभावती देवीचे पुरातन मंदिर मुस्लिम राजवटीत उदध्वस्त होऊन सध्याच्या रोशन खान गल्ली मशिदीत रुपांतर झाल्याची स्थानिक परंपरा आहे. सातवाहनांची राजवट, वाकाटाकांची राजवट, कलचुरींची राजवट, राष्ट्रकूट राजे, चालुक्य घराणे व बाराव्या शतकातील देवगिरीचे यादव घराणे एवढ्या प्रदिर्घ कालावधीपर्यंत आपल्या परभणीला समृद्ध विदर्भाचा वारसा होता हे विसरता येणार नाही. यापुढील कालखंड मोगल—मराठा संघर्षाचा आहे. पुढे औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगलांचे दक्षिणेकडील राज्य नाहीसे झाले पण त्यांच्याच सुभेदारापैकी हैद्राबादच्या निजाम घराण्याचा संस्थापक आसफजहा याने आपली वेगळी चूल मांडून हैद्राबादचे राज्य निर्माण केले. पुढे निजाम व मराठे संघर्ष होत राहीला. पुढे इंग्रज व निजाम यांच्या मध्ये ऐतिहासिक तह होऊन निजामाने ५० लाख रुपये महसुली उत्पन्नाचे जिल्हे इंग्रजांना दिले. या सर्व बाबींचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेला आहे. परभणी जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा प्राप्त झालेला आहे.

प्रकरण २ रे परभणी जिल्ह्यातील दलित चळवळ :—

प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्यातील दलित चळवळीचा परामर्श घेण्यात आलेला आहे. परभणी जिल्ह्यातील दलित चळवळ ही महाराष्ट्राच्या दलित चळवळीतील एक अत्यंत महत्वाचा टप्पा समजला जातो. प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्यातील दलित चळवळीचा उदय, विकास दलित पॅथरचा उदय व विकास रिपब्लिकन पक्षाचे कार्य, मासमुव्हमेंट, आंबेडकर चळवळीचा विकास, आंदोलनातील परभणी जिल्ह्यातील हुतात्मे, परभणी जिल्ह्यातील दलित कार्यकर्ते व दलित महिला आघाडीचे कार्य या विविध टप्याच्या माध्यमातून परभणी जिल्ह्यातील दलित चळवळ प्रवास करताना अभ्यासाअंती दिसून येते. विविध टप्याच्या आधारावर मजल दरमजल करताना दलित चळवळ ही विकासाच्या टप्यावर जाऊन पोहचल्याने परभणी जिल्हा हा दलित चळवळीचा बालेकिल्ला बनला हे प्रस्तुत प्रकरणात दिसून येते. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील दलित चळवळ ही ऐतिहासिक व रोमहर्षक आहे हे स्पष्ट होते.

प्रकरण ३ रे परभणी जिल्ह्यातील स्त्री चळवळ

प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्यातील स्त्री चळवळीचा परामर्श घेण्यात आलेला आहे. २० व्या शतकापर्यंत भारतात स्त्री चळवळी ही विकसित झालेली नव्हती. स्त्री ही 'चुल व मुल' एवढेच तिचे कार्यक्षेत्र मर्यादीत होतो. परंतु २० व्या शतकात स्त्री मुक्तीचा नवा अध्याय सुरू झाल्याने याचा प्रभाव मराठवाड्यातील परभणी जिल्ह्याच्या स्त्री चळवळीवर १९५६ ते २०११ या काळात परभणी जिल्ह्यातील स्त्री चळवळीला गती प्राप्त झाल्याने परभणी जिल्ह्यात या काळात राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक या क्षेत्रात स्त्री चळवळीने पदार्पण केले व त्यामुळे परभणी जिल्ह्यातील स्त्री विकासाला एक वेगळी दिशा प्राप्त झाल्याने परभणी जिल्ह्यात महिलांचे या क्षेत्रात सबलीकरण होण्यास मदत झाली. हे सबलीकरण फक्त उच्च वर्गापुरतेच मर्यादीत न राहता ते दलित, शेतकरी या बहुजन समाजापर्यंत जाऊन पोहचले हे या प्रकरणात अभ्यासाअंती स्पष्ट झाले. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील स्त्री चळवळ ही महाराष्ट्राच्या इतिहासाचा एक अविभाज्य भाग बनली हे अभ्यासवरून स्पष्ट होते.

प्रकरण ४ थे परभणी जिल्ह्यातील सामाजिक चळवळ

प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्यातील सामाजिक, सांस्कृतिक व पत्रकारीता चळवळीचा संशोधनात्मक परामर्श घेण्यात आला आहे. स्वातंत्र्यापुर्वी या आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, विकासापासून दूर होत्या. परंतु १९५६ ते २०११ या काळात भारत सरकारने राजकीय व घटनात्मक सोयी सुविधा बहाल केल्याने सामाजिक चळवळ ही विकासाकडे वाटचाल करू लागली. यातुनच या राजकीय, शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात जागृती निर्माण झाल्याने राजकीय व सामाजिक क्षेत्रात चळवळीच्या माध्यमातून आपला विकास साध्य केल्याने परभणी जिल्ह्यात

विकासाच्या पटप्यावर १९५६ ते २०११ या काळात जाऊन पोहचल्या व सामाजिक चळवळ गतिमान बनली हे या संशोधनातून स्पष्ट झाले आहे.

प्रकरण ५ वे : परभणी जिल्ह्यातील सांस्कृतिक चळवळ

परभणी जिल्ह्यात १९५६ ते २०११ या काळात सांस्कृतिक चळवळ ही प्रस्तुत प्रकरणात विकासाच्या दिशेने वाटचाल करीत असताना दिसते. परभणी जिल्हा हा या काळात सांस्कृतिक क्षेत्रात मागासपणा सोडून सांस्कृतिक परिवर्तनाकडे वाटचाल करू लागला. महाराष्ट्र व मराठवाड्याच्या सांस्कृतिक पाऊलावर पाऊल ठेवून परभणी जिल्ह्याने सांस्कृतिक क्रांती घडवून आणण्यासाठी अनेक कलावंतांनी हातभार लावला हे संशोधनात स्पष्ट करण्यात आले आहे. परभणी जिल्ह्याला कला, साहित्य शिल्प स्थापत्यांचा फार मोठा ऐतिहासिक वारसा प्राप्त झालेला आहे. हा वारसा १९५६ ते २०११ या काळात अनेक कलावंत साहित्यिक कारागीर, नाटककार, संगीतकार यांनी विकसित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच परभणी जिल्ह्यातील खासदार संजय जाधव, आमदार रामप्रसाद बोर्डीकर, मा. मंत्री गणेशराव दुधगावकर, मा. मंत्री रावसाहेब जामकर, या राजकीय नेते मंडळीनी सांस्कृतिक वैभवात भर टाकण्याचे महत्वाचे कार्य केल्याने परभणी जिल्हा हा महाराष्ट्रात सांस्कृतिक नकाशावर सांस्कृतिक जिल्हा म्हणून ओळखला जाऊ लागला. याचा परामर्श हा या प्रकरणात संशोधनाच्या आधारे घेण्यात आला आहे.

प्रकरण ६ वे : परभणी जिल्ह्यातील पत्रकारिता चळवळ

प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्यातील पत्रकारीता चळवळ ही अत्यंत महत्वापूर्ण आहे. निजाम काळात १७२४ ते १९४८ पर्यंत वृत्तपत्राला स्वातंत्र्य हे नव्हते. परंतु १९४८ ते २०११ या काळात पत्रकारीता चळवळीला स्वातंत्र्य मिळाले व त्यामुळे परभणी जिल्ह्यात या काळात निर्भिड व नि:पक्षपाती पत्रकारीता चळवळ विकसीत झाल्याने परभणी जिल्ह्याच्या विकासाला ही चळवळ पुरक ठरली हे स्पष्ट होते.

१९५६ ते २०११ या काळात शेतमजूर, स्त्री प्रश्न, दलित कामगार, शैक्षणिक प्रश्न या प्रमुख प्रश्नावर पत्रकारीता चळवळीने ताशेरे ओढल्याने ग्रामीण भागापासून ते शहरी भागातील सर्व जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न या चळवळीने केल्याने ही चळवळ परभणी जिल्ह्याच्या विकासाचा एक महत्वपूर्ण भाग बनला हे प्रस्तुत प्रकरणातील संशोधनाद्वारे स्पष्ट होते.

प्रकरण ७ वे : परभणी जिल्ह्यातील शेतकरी चळवळ

प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्यातील शेतकरी चळवळीचा संशोधना आधारे अभ्यास करण्यात आलेला आहे. भारत व महाराष्ट्र हा कृषिप्रधान असल्याने परभणी जिल्हा सुद्धा कृषिप्रधान आहे. स्वातंत्र्योत्तर काळात म्हणजे १९४८ ते २००५ या काळात ही शेतकऱ्यांचे आंदोलन झालीत. ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत. परभणी जिल्ह्यात सुद्धा १९८२ ते २०११ या काळात शेतकरी

संघटनेच्या माध्यमातून श्री शरद जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. माणिक कदम, आमृतराव काळदाते, विजयराव जोशी, विलास बाबर यांनी या काळात शेतकरी चळवळ विकसीत केलेली आहे रास्ता रोको ऊस, कापूस, आंदोलने, कर्जमुक्ती आंदोलने, लक्ष्मी मुक्ती, कार्यक्रम, विजेचा प्रश्न या प्रश्नांना मुलभूत मानून ते सोडविण्याचा प्रयत्न विविध आंदोलनाच्या माध्यमातून शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी केलेला आहे. याचा परामर्श संशोधनाआधारे या प्रकरणात घेतला आहे.

प्रकरण ८ वे : जिल्ह्यातील कामगार चळवळ

परभणी जिल्ह्यातील कामगार चळवळ सुद्धा प्रस्तुत प्रकरणात अभ्यासलो आहे. कामगार चळवळ ही परभणी जिल्ह्यातील एक महत्वपूर्ण असून भांडवलदारांच्या विरोधात उभे टाकून आपल्या हक्काचे रक्षण करण्यासाठी कामगारांनी परभणी जिल्ह्यात अनेक कामगार संघटना १९५० ते २०११ या काळात निर्माण केल्या. त्यामध्ये उस्मानशाही मिल कामगार संघटना, मार्क्सवादी कम्युनिष्ठ पक्ष संघटना, इंटक, आयटक, हमाल—मापाडी कामगार संघटना, एस.टी. कामगार सेना, अखिल भारतीय ॲटो संघटना, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ संघटना, रेल्वे कामगार संघटना या सर्व संघटनांनी कामगारांच्या होणाऱ्या पिळवणुकीला विरोध करून संप आंदोलने यांच्या माध्यमातून कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्व घडामोडीचा परामर्श प्रस्तुत प्रकरणात घेण्यात आलेला आहे. कामगार चळवळ ही परभणी जिल्ह्याच्या विकासाचे एक महत्वाचे अंग बनलेले आहे.

प्रकरण ९ वे : परभणी जिल्ह्यातील शैक्षणिक चळवळ

प्रस्तुत प्रकरणात परभणी जिल्ह्यातील शैक्षणिक चळवळीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. परभणी जिल्हा हा निजामसत्तेच्या अंमलाखाली २२५ वर्षे असल्याने या काळात परभणी जिल्ह्यातील लोकांचा शैक्षणिक विकास झाला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम सत्ता संपुष्टात आल्याने या जिल्ह्यातील जनतेला शैक्षणिक स्वातंत्र्य मिळाले. मातृभाषेतून व मुक्त शिक्षण परभणी जिल्ह्यातील लोकांना घेता येत असल्याने १९७० ते २०११ या काळात परभणी जिल्ह्याने शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवून आणली.

तसेच, १९७० ते २०११ या काळात स्वामी रामानंद तीर्थ, श्री गणेशराव दुधगावकर, श्री रामप्रसाद बोर्डीकर, श्री. रावसाहेब जामकर, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, सावित्रीबाई फुले, डॉ. पंजाबराव देशमुख, मा. राहूल पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक यांच्या शैक्षणिक कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून परभणी जिल्ह्यात शिक्षणप्रेमी राजकारण्यांनी बहुजन शेतकरी, दलित, कामगार या बहुजन समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षणाची गंगा सामान्यांच्या दारोदारी नेऊन पोहचविली. त्यांच्या या अदभूत शैक्षणिक कार्यामुळेच प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत परभणी जिल्ह्यात शैक्षणिक

विकास झाला हे या संशोधन विषयातून सिद्ध झाले आहे. तसेच नांदेड जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासात नांदेड येथील स्वा.रा.ती.म. विद्यापीठाने व परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ उच्च शिक्षणात एक वेगळी दिशा प्राप्त करून दिल्याने १९५० ते २०११ या काळात महाविद्यालये (४३), प्राथमिक शाळा (९५१), माध्यमिक शाळा (४०), सामान्य शिक्षण संस्था (१२) परभणी जिल्हा हा शैक्षणिक क्षेत्रात प्रगतीपथावर जाऊन पोहचला हे या प्रस्तुत प्रकरणाच्या अभ्यासावरून स्पष्ट होते. या काळात शैक्षणिक चळवळ ही ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंत विकासाच्या टप्प्यावर जाऊन पोहचली.

प्रकरण १० वे : निष्कर्ष

नांदेड जिल्ह्यातील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळी एक ऐतिहासिक अभ्यास (इ.स. १९५६ ते २०११) या संशोधन विषयाचे निष्कर्ष सारांश रुपाने खालील प्रमाणे सांगता येईल.

अ) परभणी जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा प्राप्त झाल्याने मराठवाड्यात परभणी जिल्हा समजला जातो.

आ) परभणी जिल्ह्यातील दलित चळवळ ही वैशिष्टयेपूर्ण असून या चळवळीचा प्रभाव संपूर्ण परभणी जिल्ह्यावर पडलेला आहे. महाराष्ट्राच्या दिलत चळवळीचा एक अविभाज्य अंग परभणी जिल्ह्यातील दलित चळवळ होय.

इ) परभणी जिल्ह्यातील स्त्री चळवळ ही महत्वपूर्ण असून या चळवळीने परभणी जिल्ह्याच्याराजकीय, शैक्षणिक सामाजिक आर्थिक क्षेत्रात महत्वाची भूमिका निभावलेली दिसून येते.

ई) परभणी जिल्ह्यातील सामाजिक चळवळीने परभणी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला मौलीक हातभार लावल्याचा दिसून येतो.

उ) परभणी जिल्ह्यातील सांस्कृतिक चळवळीने मागासपणा सोडून सांस्कृतिक परीवर्तनाकडे वाटचाल करू लागला.

ऊ) परभणी जिल्ह्यातील पत्रकारीता चळवळीने परभणी जिल्ह्याच्या विकासाला मदत केल्याने ही चळवळ पुरक ठरल्या हे स्पष्ट होते.

ए) परभणी जिल्ह्यातील शेतकरी चळवळीने सामाजिक परिवर्तनाचे एक महत्वाचे माध्यम बनलेले आहे.

ऐ) परभणी जिल्ह्यातील कामगार चळवळीने भांडवलदारांच्या विरोधात उभे टाकून आपल्या हक्काचे रक्षण केले.

ओ) परभणी जिल्ह्यातील शैक्षणिक चळवळ ही विकसीत बनली असून ती समाजाच्या विकासाला गती देण्यासाठी परिवर्तनशिल बनली आहे.

समारोप:

वरील सर्व निष्कर्षावरून परभणी जिल्ह्यातील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळी : एक ऐतिहासिक अभ्यास (इ.स. १९५६ ते २०११) या प्रस्तुत संशोधन विषयावरून परभणी जिल्हा हा सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळीचे माहेर घर मराठवाड्यात बनलेला आहे. हे संशोधनाअंती स्पष्ट झाले.

९) संदर्भ सूची

१. अहिरे न.—शेतकरी संघटना विचार, भगवती प्रकाशन, सटाणा — १९८४

२. अभ्यंकर वा.ना.—नेतृत्वाचे पैलू स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे ऑगस्ट १९९५

३. अडकिणे बा.—ग्रामीण क्रांतीच्या दीशा, गोमटेश प्रकाशन, परभणी — १९९८

४. अग्रवाल जे.सी.—भारत मे नारी शिक्षा, विद्या विहार प्रकाशन,नई दिल्ली, १९९८

५. अयोध्या सिं.—भारत का मजदूर आंदोलन, हिमालय प्रकाशन, नई दिल्ली — २००५

६. अवस्थी रा.—शहरापासून दूर नॅशनल पब्लिसिंग हाऊस, नई दिल्ली — २००२

७. आहेर हि.रा.—उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, श्री विद्या प्रकाशन, नागपूर — २००२

८. डॉ. आंबेडकर बा.—शुद्रपुर्वी कोण होते, क्षितीज प्रकाशन, नागपूर — २००९

९. बगुल बा.—वेदाआधी होतास तु. दिशा प्रकाशन, नाशिक — २००४

१०. भागवत वि.—स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे — २००४

११. भागवत वि.—शेतकरी महिला व पंचायत राज, शेतकरी प्रकाशन आंबेठाण — १९८७

१२. भोळे भा.ल.—भारताचे स्वातंत्र्यास पन्नास वर्षाचा मागोवा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद — १९९८

१३. भुसारी र.भ.—महाराष्ट्रातील प्राचीन जनपदे, मराठवाडा इतिहास संशोधन मंडळ, पुणे — १९७४

१४. भांडारकर रा.गो.—आर्लि हीस्ट्री ऑफ डेक्कन, कॉटीनेटल प्रकाशन, पुणे — १९८८

१५. भागवत यु./जोशी ल.—जिजिनिषा कर्तेपणाचा इतिहास, स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ, पुणे — १९९६

१६. डॉ. भामरे स.—स्त्रीवादी चळवळीचा इतिहास (शोधनिबंध) राष्ट्रीय इतिहास परिषद, लातूर फेब्रुवारी, २०१०
१७. **Chaurasia B.P. – Qipted from women status in India, Chugh Publications, New Delhi**
१८. दातार छा.—स्त्री पुरुष तुलना, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई — १९८४
१९. प्रा. देशमुख मा.मा. — मराठा कुणबी समाजाची दशा आणि दिशा, शिवभारती प्रकाशन, नागपूर — १९९३
२०. देशमुख रा.नी—आपला परभणी जिल्हा कल्पना प्रकाशन, नांदेड — २००६
२१. धर्माधिकारी दा.—क्रांतीवादी, तरुणानो परमधाम प्रकाशन, पवनार — १९९३
२२. प्रा. धांडे बी.एस.—डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बहुजन नेतृत्व, कौशल्य, प्रकाशन, औरंगाबाद—२००५
२३. दुबे शा.च.—मानवी और संस्कृती राजकमल प्रकाशन, दिल्ली — १९६९
२४. दिनकर रा.शि.—भारत की जनजातीयॉ किताबघर, दिल्ली — २०००
२५. डॉ. देव पी.आर.—स्थानिक इतिहासाचे साहित्य एक शोध कैलास प्रकाशन, औरंगाबाद — १९८५
२६. फडके य.दी.—२०व्या शतकातील महाराष्ट्र (खंड—१) १९८९
२७. गवाणकर ये.—मराठी स्त्री रावतीचे राजकणी रूप आदित्य प्रकाशन, पुणे — १९९६
२८. डॉ. गाठाळ एस. एस.—आधुनिक महाराष्ट्रचा इतिहास कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २००५
२९. डॉ. कठारे अ.मु.—मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, लातूर, २००८
३०. लिंबाळे श.—दलित पॅंथर चळवळीचे मूल्यमापन, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८९
३१. प्रा.डॉ. लळीत बाळकृष्ण—श्री संत जनाबाई चरित्र, अमोल प्रकाशन, १३२४ सदाशिव पेठ, पुणे— २०१२.